मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नागरिकांसाठी 'महापौर वैद्यकीय आर्थिक सहाय्य योजना' सुरू

## गंभीर आजार व शस्त्रक्रियांसाठी मिळणार आर्थिक मदत; महापौर कार्यालयामार्फत मिळणार योजनेचा लाभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना वैद्यकीय उपचारांसाठी मदत मिळावी या उद्देशाने 'महापौर वैद्यकीय आर्थिक सहाय्य योजना' सुरू करण्यात आली आहे. यामध्ये गंभीर आजार, उपचार किंवा शस्त्रक्रिया करण्यासाठी अडचणीत असलेल्या नागरिकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




महापौर रवी लांडगे आणि स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत गरजू रुग्णांना त्यांच्या उपचारासाठी रुग्णालयाच्या नावाने धनादेशाद्वारे आर्थिक मदत दिली जाणार आहे. यामुळे उपचारासाठी आवश्यक असलेला आर्थिक भार काही प्रमाणात कमी होऊन नागरिकांना वेळेवर उपचार घेणे शक्य होणार आहे.

योजनेचा लाभ मिळविण्यासाठी अर्जामध्ये नमूद केलेली माहिती अचूक असणे आवश्यक असून कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतरच आर्थिक सहाय्य मंजूर केले जाईल. अर्ज मंजूर झाल्यानंतर संबंधित रुग्णालयाच्या नावाने धनादेशाद्वारे आर्थिक मदत दिली जाईल.

### प्रभाग २१ मध्ये बदल

» या योजनेचा लाभ घेण्यासाठी रुग्ण किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या महापौर कार्यालयात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
» रुग्णाचे आधारकार्ड (सत्यप्रत)
» रेशनकार्डाची प्रत
» तहसीलदार कार्यालयाकडील उत्पन्नाचा दाखला
» स्थानिक नगरसेवकांचे शिफारसपत्र
» रुग्णालयाकडून देण्यात आलेले उपचार खर्चाचे अंदाजपत्रक (डॉक्टरांच्या सही व शिक्क्यासह)

"शहरातील गरजू नागरिकांना वेळेवर उपचार मिळावेत आणि आर्थिक अडचणीमुळे कोणालाही वैद्यकीय सेवा नाकारावी लागू नये, यासाठी महापालिकेच्या माध्यमातून ही योजना सुरू करण्यात आली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना उपचारासाठी मदत मिळावी आणि त्यांना दिलासा मिळावा हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे."

- रवी लांडगे, महापौर,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# श्रीक्षेत्र आळंदी यात्रेकरिता अनुदान वाढीसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना "साकडे"

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र आळंदी येथे होणाऱ्या धार्मिक यात्रांसाठी आवश्यक खर्च वाढत असताना सध्याचे शासकीय अनुदान अपुरे पडत असल्याने ते वाढवण्याची मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी सविस्तर पत्र पाठवून आळंदी नगरपरिषदेवरील आर्थिक ताण कमी करण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची विनंती केली आहे.



आमदार लांडगे यांनी पत्रात नमूद केले आहे की, आळंदी नगरपरिषदेला सध्या यात्राकराच्या स्वरूपात केवळ १.६२ कोटी रुपयांचे अनुदान मिळते. मात्र, सन २०२३-२४ या कालावधीत यात्रेसाठी नगरपरिषदेला तब्बल २.७३ कोटी रुपयांचा खर्च करावा लागला. परिणामी, सुमारे १.११ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च नगरपरिषदेच्या स्वतःच्या निधीतून करावा लागला आहे. त्यामुळे नगरपरिषदेवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे.

याच आर्थिक तणावामुळे नगरपरिषदेची वीज देयके आणि शासकीय पाणीपट्टी मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिल्याचेही त्यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. यात्रेच्या व्यवस्थेसाठी मोठ्या प्रमाणावर स्वच्छता, प्रकाशयोजना, पाणीपुरवठा, वाहतूक नियंत्रण आणि सुरक्षा व्यवस्था उभारावी लागते. मात्र सध्याचे अनुदान या खर्चासाठी अपुरे ठरत असल्याने नगरपरिषदेला वारंवार स्वतःच्या निधीवर ताण येत आहे.

( उर्वरित पान 2 वर )

"श्रीक्षेत्र आळंदी हे वारकरी संप्रदायाचे पवित्र तीर्थक्षेत्र असून दरवर्षी लाखो भाविक येथे येत असतात. त्यामुळे यात्रेच्या काळात स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाशयोजना आणि सुरक्षेसाठी नगरपरिषदेला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. सध्याचे शासकीय अनुदान अपुरे पडत असल्याने ते वाढवणे आवश्यक आहे. या संदर्भात मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली असून, आळंदी नगरपरिषदेला सक्षमपणे काम करता यावे आणि भाविकांना उत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असा मला विश्वास आहे.

- महेश लांडगे, आमदार,,
भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# 'अटल महाआरोग्य शिबिर' राज्यातील आरोग्य सेवेचे रोल मॉडेल

## डॉ. ओमप्रकाश शेटे यांचे गौरवोद्गार; जनसेवेचे मिशन अखंड चालविणाऱ्या आमदार शंकर जगताप यांचे कार्य कौतुकास्पद

**पिंपरी | प्रतिनिधी**

"राज्यातील सामान्य आणि गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मोफत मिळवून देण्यासाठी 'आयुष्मान भारत मिशन' आणि 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी' हे मोठे आधारवड ठरत आहेत. पिंपरी-चिंचवडमधील हे 'अटल महाआरोग्य शिबिर' केवळ एक उपक्रम नसून, ते खऱ्या अर्थाने जनसेवेचे मिशन आहे. या सेवेचा वसा घेऊन आमदार शंकर जगताप आणि त्यांचे सहकारी स्वर्गीय लक्ष्मणभाऊ जगताप यांचा आरोग्य सेवेचा वारसा अत्यंत प्रामाणिकपणे पुढे नेत आहे," असे गौरवोद्गार आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी शनिवारी काढले.



सांगवी पीडब्ल्यूडी मैदान येथे लोकनेते स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या ६३ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'अटल महाआरोग्य शिबिरा'च्या उद्घाटन प्रसंगी डॉ. शेटे बोलत होते. शिबिराचे आयोजन आमदार शंकर जगताप मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. यावेळी महापौर रवी लांडगे, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समितीचे सभापती संजय काटे, कला, क्रीडा, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे, शिक्षण समितीच्या सभापती रवीना अंगोळकर, आरोग्य विभाग पुणे परिमंडळाचे उपसंचालक भगवान पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले, पिंपरी चिंचवड महापालिका वायसीएम हॉस्पिटल वैद्यकीयअधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, पिंपरी चिंचवड महापालिकेचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. लक्ष्मण गोफणे, डॉ. मनोज कुमार शर्मा, एमक्युअर फार्मासिटिकलचे उपाध्यक्ष उपाध्यक्ष राजेश नायर तसेच विविध आरोग्य संस्थांचे प्रतिनिधी, 70 हून अधिक हॉस्पिटलचे मान्यवर डॉक्टर, परिचारिका, रुग्णालय कर्मचारी आदी उपस्थितआदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे मनोगत डॉ. देविदास शेलार यांनी व्यक्त केले.

डॉ. ओमप्रकाश शेटे त्यांनी आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशाला दिशा देत असल्याचे नमूद केले. डॉ. शेटे यांनी मुख्यमंत्री सहायता निधी आणि आयुष्मान भारत योजनेच्या यशावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "पूर्वी फक्त २५ हजार रुपयांपर्यंत मिळणारी मदत आता २ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. शासन आणि धर्मादाय संस्थांच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे १८०० कोटी रुपयांची मदत गरजू रुग्णांपर्यंत पोहोचवण्यात आली आहे, जो एक विक्रम आहे." महात्मा फुले जन आरोग्य योजनेची मर्यादा १.५ लाखांवरून ५ लाख रुपये करण्यात आली आहे. राज्यातील संलग्न रुग्णालयांची संख्या १७९२ वरून ४५३७ पर्यंत वाढवण्यात आली आहे, जेणेकरून दुर्गम भागातील रुग्णांनाही उपचार मिळतील

महिलांच्या आरोग्याबाबत बोलताना डॉ. शेटे यांनी सर्वाइकल कॅन्सर (गर्भाशयाचा कॅन्सर) रोखण्यासाठी लसीकरणाचे महत्त्व सांगितले. "लसीकरणाबाबत समाजात पसरवले जाणारे गैरसमज चुकीचे आहेत. 'अटल महाआरोग्य शिबिरा'च्या माध्यमातून जास्तीत जास्त महिलांपर्यंत या आरोग्य सुविधा पोहोचवणे हे आमचे ध्येय आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. समाजातील उपेक्षित असलेल्या तृतीयपंथी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आयुष्मान मिशनच्या माध्यमातून योजना आणल्या जातील. रामायणातील त्यांच्या निष्ठेचा दाखला देत त्यांनी सांगितले की, तृतीयपंथी समाजाला 'आयुष्मान भारत' योजनेचा १००% लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनामार्फत विशेष मिशन राबवले जाईल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाना शिवले यांनी केले.

### स्वतंत्र 'कंट्रोल रूम'

» आयुष्मान भारत कार्ड आणि सॉफ्टवेअरमधील तांत्रिक बाबी लवकरच सुरळीत होतील. विशेषतः पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील तक्रारी सोडवण्यासाठी स्वतंत्र 'कंट्रोल रूम' (नियंत्रण कक्ष) किंवा कॉन्फरन्स रूम उभारण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

### स्वतंत्र 'कंट्रोल रूम'

» "स्वर्गीय आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी ११ वर्षांपूर्वी या सेवायज्ञाचे रोपटे लावले होते, आज त्याचे रूपांतर एका विशाल वटवृक्षात झाले आहे. हे अकरावे 'अटल महाआरोग्य शिबिर' केवळ एक औपचारिक कार्यक्रम नसून, भारतीय जनता पार्टीच्या 'अंत्योदय' संकल्पनेतून शेवटच्या घटकापर्यंत विकास आणि सेवा पोहोचवण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. यंदाच्या शिबिरात ८५ नामांकित रुग्णालये सहभागी असून ११० हून अधिक आजारांवर केवळ मोफत तपासणीच नाही, तर पुढील उपचारांचीही संपूर्ण जबाबदारी आमची आहे. राज्य सरकारने नुकत्याच सादर केलेल्या बजेटमध्ये २९ महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रांसाठी 'शहरी आरोग्य आयुक्तालय' स्थापन करण्याचा जो निर्णय घेतला आहे, त्याबद्दल मी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे मनापासून आभार मानतो. महात्मा फुले जन आरोग्य योजनेतील उपचारांची संख्या १३५६ वरून ३३९९ पर्यंत वाढवून हे 'जनसामान्यांचे शासन' असल्याचे सरकारने सिद्ध केले आहे. याशिवाय गंभीर आजारांचा समावेश आयुष्मान भारत योजनेत करून रुग्णांना दिलासा द्यावा, अशी मागणी आमदार शंकर जगताप यांनी यावेळी केली.

# चिंचवडमध्ये उभारणार 'अजितसृष्टी'

## महापौर रवी लांडगे यांची घोषणा; सुनेत्रा पवार यांच्या संकल्पनेनुसार साकार होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने चिंचवड येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भव्य अजितसृष्टी उभारण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा करून त्यांच्या संकल्पनेनुसार ती सृष्टी निर्माण केली जाईल, असे सांगून पिंपरी-चिंचवड शहरासाठी अजितदादांचे मोठे योगदान असून, ते कोणी नाकारू शकत नाही, असे महापौर रवी लांडगे यांनी शुक्रवारी (दि. 6) स्पष्ट केले. महापौर पदाचा महिन्याभराचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानिमित्त ते पत्रकारांशी बोलत होते. या वेळी उपमहापौर शर्मिला बाबर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते



महापौर लांडगे म्हणाले की, अजितसृष्टी निर्माण करण्याबाबत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासोबत बैठक घेऊन चर्चा करण्यात येणार आहे. त्यांच्या संकल्पनेनुसार ती भव्य अजितसृष्टी असेल. त्यात अजितदादांनी शहरात केलेल्या विकासकामांचे दर्शन घडविले जाईल. त्यानुसार, अजितसृष्टी बनविण्याचा तसेच, सभागृहात अजितदादांचे तैलचित्र लावण्याचा ठराव करण्यात येईल. अजितसृष्टीबाबत सन 2026-27 च्या अर्थसंकल्पात अद्याप स्वतंत्र तरतूद करण्यात आलेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

शहरासाठी पाणीप्रश्न गंभीर आहे. भामा-आसखेड पाणी योजना लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी निष्क्रीय ठेकेदाराकडून काम काढून घेतले असून, उर्वरित कामांसाठी निविदाप्रक्रिया राबविण्यात येत आहे. तो प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहराला 167 एमएलडी अतिरिक्त स्वच्छ पाणी मिळणार आहे. अग्निशमन विभागाचे ऋषिकेश चिपाडे यांची बदली करण्यात आली असून, क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कामांची विभागणी करण्यात आली आहे.

# श्रीक्षेत्र आळंदी यात्रेकरिता अनुदान वाढीसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना "साकडे"

(पान 1 वरून)

याच आर्थिक तणावामुळे नगरपरिषदेची वीज देयके आणि शासकीय पाणीपट्टी मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिल्याचेही त्यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. यात्रेच्या व्यवस्थेसाठी मोठ्या प्रमाणावर स्वच्छता, प्रकाशयोजना, पाणीपुरवठा, वाहतूक नियंत्रण आणि सुरक्षा व्यवस्था उभारावी लागते. मात्र सध्याचे अनुदान या खर्चासाठी अपुरे ठरत असल्याने नगरपरिषदेला वारंवार स्वतःच्या निधीवर ताण येत आहे.

दरम्यान, संतश्रेष्ठ महाराजांचा संजीवन समाधी सोहळा होणार असून, या सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो वारकरी श्रीक्षेत्र आळंदी येथे येणार आहेत. त्यामुळे शहरातील पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याची आवश्यकता असल्याचे आमदार लांडगे यांनी अधोरेखित केले आहे. आळंदी नगरपरिषद प्रशासनानेही यासंदर्भात राज्य शासनाच्या नगरपरिषद संचालनालयाकडे अनुदान वाढीचा प्रस्ताव पाठवला असल्याची माहिती त्यांनी दिली. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेचे कामकाज सुरळीत आणि सक्षमपणे चालण्यासाठी यात्रा अनुदानात वाढ करण्याबाबत संबंधित विभागाला तातडीने योग्य आदेश द्यावेत, अशी मागणी आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# महापालिकेच्या प्रभाग रचनेत पुन्हा बदल

## प्रभाग 22, 29 आणि 39 च्या हद्दीत सुधारणा; प्रशासनाकडून नव्या यादीची घोषणा

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या निवडणुकीच्या प्रभाग रचनेनुसार प्रभाग समित्या, क्षेत्रीय कार्यालयांची हद्द तसेच परिमंडळे मागील आठवडयात निश्चित केली होती. मात्र, त्यात, महापालिका आयुक्तांच्या सूचनेनुसार पुन्हा बदल केला आहे. त्यात, तीन क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील प्रभागांत बदल करण्यात आले असून नवीन सुधारीत यादी जाहीर केली आहे.

प्रामुख्याने प्रभाग २९, २२ आणि ३९ प्रभागांचे क्षेत्रीय कार्यालय बदलण्यात आले आहे. हे बदल करताना प्रशासनाने पुन्हा एकदा भाजप नगरसेवकांच्या मागणीकडे लक्ष दिले आहे. नगररस्ता तसेच येरवडा क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील काही प्रभागांची क्षेत्रीय कार्यालयांची हद्द बदलण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसने महापालिका आयुक्तांकडे पत्राद्वारे केली होती.




### प्रभाग ३९ चा विभाग बदल

» प्रभाग क्रमांक ३९ अप्पर-सुपर इंदिरानगर हा यापूर्वी कोंढवा-उंड्री क्षेत्रीय कार्यालयाशी जोडण्यात आला होता. मात्र नव्या निर्णयानुसार हा प्रभाग आता बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयाशी जोडण्यात आला आहे. प्रशासनाने प्रभागांचे भौगोलिक व प्रशासनिक संतुलन लक्षात घेऊन हा बदल केल्याचे स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे संबंधित भागातील नागरिकांच्या विविध महापालिका सेवांसाठी बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयाशी संपर्क साधावा लागणार आहे.

त्यावर, सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासनही आयुक्तांनी दिले होते. मात्र, राष्ट्रवादीच्या या मागणीला प्रशासनाने कात्रजचा घाट दाखविला असून या दोन्ही क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत कोणताही बदल केलेला नाही.

पूर्वीच्या आदेशात प्रभाग क्रमांक २९ डेक्कन जिमखाना-हॅपी कॉलनी हा छत्रपती शिवाजीनगर- घोले रस्ता क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतून वगळून आता वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयास जोडण्यात आला आहे. प्रभाग २२ काशेवाडी- डायसप्लॉट हा बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयातून वगळून तो कसबा क्षेत्रीय कार्यालयास जोडण्यात आला आहे.

प्रभाग ३९ अप्पर -सुपर इंदीरानगर हा या पूर्वी कोंढवा-उंड्री क्षेत्रीय कार्यालयास जोडण्यात आला होता. तो आता बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयास जोडण्यात आला आहे. असे तीन प्रमुख बदल प्रशासनाकडून करण्यात आले आहेत.

### प्रभाग २९ मध्ये बदल

» महापालिकेच्या सुधारित आदेशानुसार प्रभाग क्रमांक २९ डेक्कन जिमखाना-हॅपी कॉलनी हा पूर्वी छत्रपती शिवाजीनगर-घोले रस्ता क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत होता. मात्र नव्या बदलानुसार हा प्रभाग आता वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाशी जोडण्यात आला आहे. प्रशासनाने प्रभाग रचनेत समतोल साधण्यासाठी हा बदल केल्याचे सांगितले आहे. त्यामुळे संबंधित भागातील प्रशासनिक कामकाज आता वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयातून हाताळले जाणार आहे.

### प्रभाग २२ ची हद्द बदलली

» प्रभाग क्रमांक २२ काशेवाडी-डायसप्लॉट हा पूर्वी बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत समाविष्ट होता. सुधारित आदेशानुसार हा प्रभाग बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयातून वगळून कसबा क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीत आणण्यात आला आहे. या बदलामुळे स्थानिक प्रशासनिक कामकाजाची जबाबदारी आता कसबा क्षेत्रीय कार्यालयाकडे राहणार आहे. नागरिकांच्या सेवा व कामकाज अधिक सुलभ करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात आहे.

# रात्री 8 नंतर बांधकामे बंद! महापालिकेचा मोठा निर्णय; नियम मोडल्यास होणार कारवाई..

## सकाळी 8 ते रात्री 8 हीच असेल बांधकामाची वेळ; वायू प्रदूषण रोखण्यासाठी महापालिका आणि 'एमपीसीबी' कडून नवीन नियमावली जाहीर.

**पुणे | प्रतिनिधी**

बांधकामांपासून होणारे प्रदूषण आणि अनधिकृत बांधकाम रोखण्यासाठी महापालिका आता कडक पावले उचलणार आहे. त्यानुसार रात्री आठनंतर बांधकाम सुरू ठेवता येणार नाही. सकाळी आठ ते रात्री आठ या वेळेतच बांधकाम करता येईल असे आदेश काढण्यात येणार आहेत. तसेच अनधिकृत बांधकामे पाडताना होणारा खर्च संबधितांकडून वसुल करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

ही माहिती शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी दिली. अनधिकृत बांधकामे, बांधकामांमुळे होणारे वायू प्रदूषण हा सध्या शहरातील कळीचा मुद्दा आहेत. प्रदुषणामुळे पुणे देशातील पहिल्या दहा प्रदूषित शहरांमध्ये गणले जाते. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यामुळे महापालिका आणि महाराष्ट्र प्रदूष नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) बांधकामांसाठी नियमावली तयार केली आहे.

बांधकामांच्या ठिकाणी पत्र्याचे शेड उभारणे, हिरवे कापड लावणे, बांधकाम पाडताना पाण्याची फवारणी करणे, पाच हजार चौ.फुटांवरील बांधकामांच्या ठिकाणी धुलीकणांचे प्रदूषण मोजण्यासाठी सेन्सर बसविणे आदी उपायांचे पालन होते की, नाही यावर पालिका लक्ष ठेवून आहे. हे नियम मोडणाऱ्या बांधकामांना हल्लीच स्थगितीही दिली आहे.



### पाडकाम खर्च वसुलीसाठी यंत्रणा

» अनधिकृत बांधकाम पाडण्याचा खर्च संबधितांकडून घ्यावा अशी कायद्यात तरतूद आहे. त्याचा सध्या पाठपुरावा होत नाही. निवासी बांधकाम पाडल्यावर मालकांचे नुकसान झाल्याने त्यांच्याकडून पाडकामाता खर्च वसूल होत नाही. अनेक व्यावसायिक आस्थापना फ्रंट, साईड मार्जिनमध्ये बांधकाम करतात.त्यांच्यावर कारवाई झाल्यावर मूळ जागेत व्यवसाय सुरू असतो. तसेच ही मंडळी नव्याने अनधिकृत बांधकाम करतात. याला आळा घालण्यासाठी संबधितांकडून पाडकामाचा खर्च वसूल करण्यासाठी यंत्रणा उभारण्यात येईल, अशी माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी दिली.

### अनधिकृत बांधकामे अशी रोखणार

» वॉर्डस्तरीय कनिष्ठ अभियंते, बांधकाम निरीक्षक, उपअभियंत्यांवर हद्दीतील बांधकामांचा अहवाल देणे आणि वरिष्ठ स्तरावर कार्यवाही बंधनकारक करणार. यानंतरही बेकायदा बांधकामे आढळली तर संबधित अभियंत्यांना जबाबदार धरणार. प्रदूषण रोखण्यासाठी सेन्सर बसवण्याचे बंधन पाच ऐवजी एक हजार चौ.फुटांच्या बांधकामांना लागू करणार. कनिष्ठ अभियंते, उपअभियंत्यांना दररोज माहिती भरण्यासाठी स्प्रेडशीट, ॲप बनवणार. त्यावर वरिष्ठ पातळीवरून पाहणी होणार.

# चार महामार्गांचे लवकरच भूमिपूजन; नितीन गडकरी यांची माहिती

## पुणे जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रातील रस्त्यांच्या कामांचा आढावा महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी पुण्यात घेतला.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह पुणे महानगर परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी हाती घेतलेल्या आणि गेली अनेक वर्षे प्रतीक्षेत असलेल्या पुणे-शिरूर, हडपसर-यवत, तळेगाव-चाकण-शिक्रापूर आणि नाशिक फाटा-खेड, अशा चार महामार्ग प्रकल्पांचे भूमिपूजन येत्या महिनाभरात करण्याचे नियोजन आहे, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुणे-शिरूर आणि हडपसर-यवत महामार्गावर उड्डाणपूल असणार आहे. त्यामध्ये खराडी-विठ्ठलवाडीदरम्यान देशातील सर्वाधिक लांबीचा म्हणजे ३१ किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल तयार करण्यात येणार आहे. जेणेकरून स्थानिक वाहतुकीसाठी रस्त्याचा वापर करतील, तर लांब जाणारे प्रवासी उड्डाणपुलावरून जातील, यामुळे नागरिकांचा प्रवाशांच्या वेळेत बचत होणार आहे, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

पुणे जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रातील रस्त्यांच्या कामांचा आढावा गडकरी यांनी शुक्रवारी पुण्यात घेतला. यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडील प्रकल्प, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळ (एमएसआयडीसी) आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आदी विभागांकडील प्रस्तावित असलेल्या महामार्गांच्या कामांचा आढावा घेत सद्यःस्थिती जाणून घेतली.



### नवीन मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाबाबत

- पागोटे-चौक अलाइनमेंट - जुन्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला समांतर असा एक नवीन ग्रीनफील्ड रस्ता पागोटे (बोगोट) ते चौकदरम्यान प्रस्तावित आहे.
- पुणे रिंगरोड - अटल सेतूवरून येणारी वाहतूक नवीन रस्त्याने पुण्याच्या रिंगरोडशी जोडणार.
- प्रवासाच्या वेळेत बचत - नवीन प्रकल्पामुळे मुंबई-पुणे अंतर केवळ दीड तासात कापणे शक्य होईल.
- मिसिंग लिंक प्रकल्प - मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील लोणावळ्याजवळील 'मिसिंग लिंक' मे २०२६ पर्यंत पूर्ण करणार

### नाशिक फाटा-खेड

- एकूण खर्च : ७,८०८ कोटी रु.
- दोन्ही बाजूस सेवा रस्ते
- दहा पदरी मार्ग
- ९३ टक्के भूसंपादन पूर्ण
- उर्वरित भूसंपादन २५ मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन
- मेट्रो मार्ग प्रस्तावित

### पुणे-शिरूर महामार्ग

- एकूण लांबी : सुमारे ५४ किमी
- एकूण खर्च : सुमारे ७,५१५ कोटी रु.
- खराडी ते विठ्ठलवाडीदरम्यान ३१ किमी लांबीचा उड्डाणपूल
- सहा पदरी उन्नतमार्ग

### पुणे-यवत महामार्ग

- एकूण लांबी : सुमारे ३२ किमी
- एकूण खर्च : सुमारे ५,२६५ कोटी रु.
- सहा पदरी उन्नतमार्ग
- मेट्रोचेही नियोजन

### तळेगाव-चाकण-शिक्रापूर

- एकूण लांबी : सुमारे २६ किमी
- एकूण खर्च : सुमारे ४ हजार कोटी रु.

### नऱ्हे-रावेत उड्डाणपूल

- एकूण लांबी : ३२ किमी
- एकूण खर्च : ६ हजार कोटी
- सहा पदरी मार्ग
- सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सूचना

# नवीन जीसीसी केंद्रांची घोषणा; आयटी आणि रोजगाराला चालना

## राज्य सरकारच्या धोरणानुसार 400 नवीन ग्लोबल कपॅबिलिटी सेंटर्स उभारण्याची घोषणा.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात 400 नवीन ग्लोबल कपॅबिलिटी सेंटर्स (जीसीसी) अर्थात जागतिक क्षमता केंद्र उभारण्याची घोषणा केली आहे. देशात सर्वाधिक जीसीसी केंद्र असलेल्या शहरांच्या यादीत पुण्याचा तिसरा क्रमांक लागतो. माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्राप्रमाणे जीसीसीमध्येआघाडीघेण्यासाठी महापालिकेने पुढाकार घ्यावा. त्यांना आयटीसारख्या विशेष सवलती देण्याची मागणी उद्योग घटकांकडून करण्यात येत आहे.

राज्य सरकारने 2030पर्यंत नवीन जीसीसी केंद्राच्या उभारणीतून चार लाख रोजगारनिर्मितीचे लक्ष्य ठेवले आहे. सोबतच सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांना (एमएसएमई) प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र सेवा आयुक्तालय उभारण्याची घोषणा केली आहे. महाराष्ट्रात पुणे आयटीपाठोपाठ जीसीसी केंद्राचे महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास आले आहे. त्यामुळे या निर्णयाचा शहराला अधिक लाभ होईल, असे उद्योग घटकांचे म्हणणे आहे.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड अॅग्रीकल्चरचे (एमसीसीआयए) महासंचालक प्रशांत गिरबने म्हणाले की, शहरात 400हून अधिक जीसीसी असून, सर्वाधिक जीसीसी असणाऱ्या शहरात पुणे तिसऱ्या स्थानी आहे. राज्य सरकारच्या धोरणामुळे शहरातील जीसीसींची संख्या दुप्पट होऊ शकते. शहरातील जीसीसीमध्ये आयटी रोजगारांची संख्या कमी वेगाने वाढत आहे.

संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर म्हणाले की, जीसीसीला प्राधान्य दिल्यामुळे पुणे आणि मुंबई ही शहरे जागतिक आयटी नकाशावर अधिक ठळकपणे पुढे येतील. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) प्रकल्पांसाठी केलेली तरतूद देखील भविष्यातील तंत्रज्ञानासाठी पोषक आहे



### आयटीप्रमाणे महापालिकेने घ्यावा पुढाकार

- राज्य सरकारने जीसीसी धोरण जाहीर केले आहे. आता आयटीप्रमाणे पुण्यातील महापालिकांनी पुढाकार घ्यावा. जीसीसी इमारती उभारून द्याव्यात अथवा त्यांना करसवलती द्याव्यात. दुप्पट चटई निर्देशांक (एफएसआय) द्यावे. त्यामुळे जीसीसीमध्ये गुंतवणूक आकर्षित होईल. विशेषतः मेट्रोच्या मार्गांवर या सवलती दिल्यास त्याचा अधिक फायदा होईल. यामुळे शहरात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार वाढतील, असे संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर म्हणाले.